# सार्वजनिक उपक्रम समिती

## २०१०-२०११

## ( बारावी महाराष्ट्र विधानसभा )

**महाराष्ट्र शासनाच्या सन २००७-२००८ च्या हिशेबावरील भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या (वाणिज्यिक) अहवालातील " महाराष्ट्र शहर व औद्योगिक विकास महामंडळ मर्यादित (सिडको)" यांच्या कामकाजासंबंधात प्रकरण तीन मधील अनुक्रमे परिच्छेद क्रमांक ३.१ व ३.२ तसेच " शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ " यांच्या कामकाजासंबंधात प्रकरण क्रमांक तीन मधील परिच्छेद क्रमांक ३.१६ व " मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ" यांच्या कामकाजासंबंधीच्या आढाव्याचे मूल्यमापन यावरील समितीचा**

# पाचवा अहवाल

सत्यमेव जयते

( दिनांक १९ एप्रिल २०११ रोजी विधानसभेस / विधानपरिषदेस सादर केला )

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

विधान भवन, मुंबई / नागपूर

# सार्वजनिक उपक्रम समिती

## २०१०-२०११

## ( बारावी महाराष्ट्र विधानसभा )

महाराष्ट्र शासनाच्या सन २००७-२००८ च्या हिशेबावरील भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या (वाणिज्यिक) अहवालातील "महाराष्ट्र शहर व औद्योगिक विकास महामंडळ मर्यादित (सिडको)" यांच्या कामकाजासंबंधात प्रकरण तीन मधील अनुक्रमे परिच्छेद क्रमांक ३.१ व ३.२ तसेच "शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ" यांच्या कामकाजासंबंधात प्रकरण क्रमांक तीन मधील परिच्छेद क्रमांक ३.१६ व "मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ" यांच्या कामकाजासंबंधीच्या आढाव्याचे मूल्यमापन यावरील समितीचा

# पाचवा अहवाल

# सार्वजनिक उपक्रम समिती

## (२०१०-२०११)

**समिती प्रमुख**

(१) श्री. सदाशिवराव पाटील, वि.स.स.

**सदस्य**

(२) श्री. मधुकर ऊर्फ अण्णा चव्हाण, वि.स.स.
(३) कु. प्रणिती शिंदे, वि.स.स.
(४) श्री. रमेश आनंदराव बागवे, वि.स.स.
(५) डॉ. कल्याण काळे, वि.स.स.
(६) श्री. सुभाष घोटे, वि.स.स.
(७) श्री. विवेकानंद पाटील, वि.स.स.
(८) श्री. विक्रमसिंह पाटणकर, वि.स.स.
(९) श्री. संजय वाघचौरे, वि.स.स.
(१०) श्री. हनुमंत डोळस, वि.स.स.
(११) श्री. बदामराव पंडित, वि.स.स.
(१२) श्री. सुरेश देशमुख, वि.स.स.
(१३) श्री. जयकुमार रावल, वि.स.स.
(१४) श्री. अतुल देशकर, वि.स.स.
(१५) श्री. विजयकुमार देशमुख, वि.स.स.
(१६) श्री. प्रमोद जठार, वि.स.स.
(१७) श्री. राजन विचारे, वि.स.स.
(१८) श्री. प्रताप सरनाईक, वि.स.स.
(१९) श्री. महादेव बाबर, वि.स.स.
(२०) श्री. प्रविण दरेकर, वि.स.स.
(२१) श्री. जयप्रकाश छाजेड, वि.प.स.
(२२) श्री. चरणसिंग सप्रा, वि.प.स.
(२३) श्री. हेमंत टकले, वि.प.स.
(२४) श्री. संजय केळकर, वि.प.स.
(२५) श्रीमती शोभाताई फडणवीस, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

डॉ. अ. ना. कळसे, प्रधान सचिव,
श्री. श्रीधर राजोपाध्ये, उप सचिव,
श्री. सुधीर वळवी, अवर सचिव (समिती),
श्री. अ. ल. जोशी, कक्ष अधिकारी.

## अनुक्रमणिका


| अनुक्रमांक (१) | तपशील (२) | पृष्ठ क्रमांक (३) |
|---|---|---|
| | **प्रस्तावना** | (सात) |
| एक | **महाराष्ट्र शहर व औद्योगिक विकास महामंडळ मर्यादित (सिडको)** (ले.प.अ. २००७-२००८) | |
| | (१) रजा रोखीकरणाचे अनियमित प्रदान (परिच्छेद क्रमांक ३.१) | १ |
| | (२) वायफळ खर्च (परिच्छेद क्रमांक ३.२) | ७ |
| दोन | **" शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ "** (ले.प.अ. २००७-२००८) | |
| | (१) अवजारे संचाची खरेदी (परिच्छेद क्रमांक ३.१६) | ११ |
| तीन | **" मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ " यांच्या कामकाजासंबंधी सर्वसाधारण मूल्यमापन** | १८ |
| चार | बैठकींचे परिशिष्ट | २३ |

## प्रस्तावना

मी, सार्वजनिक उपक्रम समितीचा समिती प्रमुख, समितीने अधिकार दिल्यावरून महाराष्ट्र शासनाच्या सन २००७-२००८ च्या हिशेबावरील भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या (वाणिज्यिक) अहवालातील " महाराष्ट्र शहर व औद्योगिक विकास महामंडळ मर्यादित (सिडको) " च्या कामकाजासंबंधात प्रकरण तीन मधील परिच्छेद क्रमांक ३.१, ३.२, ३.३ व " शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ " यांच्या कामकाजासंबंधात प्रकरण तीन मधील परिच्छेद क्रमांक ३.१६ तसेच " मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाच्या कामकाजाच्या आढाव्या संबंधातील " समितीचा पाचवा अहवाल (बारावी महाराष्ट्र विधानसभा) सादर करीत आहे.

" महाराष्ट्र शहर व औद्योगिक विकास महामंडळ मर्यादित " यांच्याकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक लेखी ज्ञापनावर नगरविकास विभागाचे प्रधान सचिव, श्री. टी. सी. बेंजामीन तसेच महाराष्ट्र शहर व औद्योगिक विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक, श्री. तानाजी सत्रे, श्री. काकणी, उपसचिव, नगरविकास विभाग, श्री. एस. एम. अग्रवाल, मुख्य लेखा अधिकारी, यांची समितीने गुरुवार, दिनांक ३ मार्च २०११ रोजी साक्ष नोंदवून घेण्यात आली.

" शबरी आदिवासी वित्त व विकास मर्यादित महामंडळ " यांच्याकडून आदिवासी विकास विभागाचे प्रधान सचिव, श्री. उत्तम खोब्रागडे, श्री. बी. जी. सिंह, सह सचिव, तसेच आदिवासी महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक, श्री. टी. के. बागुल, आदिवासी विकास विभाग, श्री. एम. एस. भारती, मुख्य लेखा अधिकारी व एन. डी. वऱ्हाडे, मॅनेजर (प्रोजेक्ट) यांच्या स्पष्टीकरणात्मक लेखी ज्ञापनावर समितीने मंगळवार, दिनांक ८ मार्च २०११ रोजी साक्ष नोंदवून घेण्यात आली.

" मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ " यांच्या कामकाजासंबंधातील आढाव्याबाबत देण्यात आलेल्या लेखी माहितीवर आधारित महाराष्ट्र शासनाच्या अल्पसंख्याक विकास विभागाचे प्रधान सचिव, श्री. सुनिल पोरवाल व श्रीमती एस. एस. कादरी, सह सचिव व " मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ " चे व्यवस्थापकीय संचालक, श्री. जी. आर. शेख यांची गुरुवार, दिनांक १३ जानेवारी २०११ रोजी साक्ष नोंदविण्यात आली.

श्रीमती सायंतनी जाफा, महालेखाकार, श्री. पी. पी. लोणकर, वरिष्ठ लेखापरीक्षक अधिकारी (वाणिज्यिक लेखापरीक्षक) यांनी निमंत्रणानुसार समितीच्या बैठकींना उपस्थित राहून समितीला केलेल्या मार्गदर्शनाबद्दल समिती त्यांचे आभार मानते. नगरविकास विभागाचे प्रधान सचिव, श्री. टी. सी. बेंजामीन

तसेच महाराष्ट्र शहर व औद्योगिक विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक, श्री. तानाजी सत्रे, आदिवासी विकास विभागाचे प्रधान सचिव, श्री. उत्तम खोब्रागडे, श्री. बी. जी. सिंह, सह सचिव, तसेच आदिवासी महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक, श्री. टी. के. बागुल, अल्पसंख्याक विकास विभागाचे प्रधान सचिव, श्री. सुनिल पोरवाल, मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक, श्री. जी. आर. शेख यांनी समितीला दिलेल्या संपूर्ण सहकार्याबद्दल समिती त्यांचे आभार मानते.

समितीने शुक्रवार, दिनांक १ एप्रिल २०११ रोजी झालेल्या बैठकीत या अहवालावर विचार करून तो काही सुधारणांसह संमत केला.

**सदाशिवराव पाटील,**
समिती प्रमुख,
सार्वजनिक उपक्रम समिती.

**विधान भवन :**
मुंबई.

## “ महाराष्ट्र शहर व औद्योगिक विकास महामंडळ मर्यादित (सिडको) ”

### एक : रजा रोखीकरणाचे अनियमित प्रदान

१.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००७-२००८ च्या (वाणिज्यिक) अहवालातील प्रकरण क्रमांक ३ मधील परिच्छेद क्रमांक ३.१ मध्ये “ रजा रोखीकरणाचे अनियमित प्रदान ” यासंबंधात महालेखाकारांनी असे अभिप्राय व्यक्त केले आहेत की, कंपनीने राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना लागू असलेल्या पगार व भत्त्यांचा स्वीकार केलेला असतांनाही रजेचे रोखीकरण जास्त दराने केले होते परिणामस्वरूप त्याबाबत रुपये ३.३३ कोटींचे अनियमित प्रदान झाले होते.

महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम, १९८१ नुसार राज्य सरकारी कर्मचारी रजेच्या रोखीकरणासाठी पात्र आहेत व रोखीकरणाचा दर रजा सुरू होतेवेळी महागाई भत्त्यासह कर्मचाऱ्यांचा पगार व स्थानिक नुकसान भरपाई भत्ता एवढाच होता परंतु त्यामध्ये घरभाडे भत्त्याचा समावेश नव्हता. महाराष्ट्र शहर व औद्योगिक विकास महामंडळ मर्यादित (कंपनी) यांनी राज्य शासनाने पाचव्या वेतन आयोगाच्या शिफारशींनुसार आपल्या कर्मचाऱ्यांसाठीच्याच वेतन श्रेणीचाच स्वीकार केलेला होता. परंतु कंपनीच्या रजेच्या नियमामध्ये विहित केले होते की, कर्मचाऱ्यांना अर्जित रजा (इ एल) व आकस्मिक रजा (सी एल) या दोन्ही रजांच्या रोखीकरणासाठी पगाराच्या दीडपट या दराने पात्र आहेत. रजेच्या रोखीकरणासाठी पगार म्हणजे वेतन व भत्ते यादराने देय होते. परंतु रोखीकरणासाठी भत्त्यांची व्याख्या कंपनीने केलेली नव्हती.

लेखापरीक्षणाच्या वेळी असे निदर्शनास (मे, २००७) आले की, कंपनीने राज्य सरकारच्या कर्मचाऱ्यांना लागू असणारे वेतन व भत्ते स्वतःच्या कर्मचाऱ्यांसाठी स्वीकारले होते. परंतु रजेचे रोखीकरण राज्य सरकारी कर्मचाऱ्यांना लागू असलेल्या एकवेळच्या वेतन व भत्त्यांइतके करण्याऐवजी दीडपट वेतन भत्त्या इतक्या दराने करण्यात आले होते. त्याचप्रमाणे घरभाडे भत्ता देखील रजा रोखीकरणामध्ये धरण्यात आला होता जो राज्य सरकारी कर्मचाऱ्यांसाठी धरण्यात येत नव्हता. त्यामुळे मार्च, २००८ रोजी संपलेल्या मागील चार वर्षांच्या कालावधीसाठी रुपये ३.३३ कोटींचे अनियमित प्रदान झाले होते (दीडपट पगारामुळे जादा प्रदान रुपये १.९३ कोटी व घरभाडे भत्ता रुपये १.४० कोटी) घरभाडे भत्ता हा प्रतीपूरक भत्ता असल्यामुळे कंपनीने तो रजा रोखीकरणामध्ये धरल्यामुळे कर्मचाऱ्याला वर्षातील १२ महिन्यांपेक्षा जास्त घरभाडे भत्त्यांचे प्रदान करण्यात आले होते. जरी याबाबत कंपनीने उत्तर सादर केले नव्हते तरी १२ डिसेंबर २००७ रोजी घेण्यात आलेल्या लेखापरीक्षण समितीच्या बैठकीत ही बाब संचालक मंडळासमोर अनियमित प्रदान कर्मचाऱ्यांकडून हप्त्यांमध्ये वसूल करण्यासाठी ठेवण्यात येईल हे मान्य केले होते.

ही बाब शासनाला/व्यवस्थापनाला कळविण्यात (जुलै, २००८)आली होती, त्यांचे उत्तर प्रलंबित होते (डिसेंबर, २००८).

**१.२** या प्रकरणी समितीला पाठविलेल्या स्पष्टीकरणात्मक लेखी ज्ञापनात महामंडळाने खुलासा करताना असे नमूद केले की, सन २००७-०८ साठी भारतीय नियंत्रक आणि महालेखापरीक्षक यांच्या लेखापरीक्षण अहवालामध्ये, असे मत मांडण्यात आलेले आहे की, सिडकोने समान संवर्गातील आपल्या कर्मचाऱ्यांसाठी ५ व्या वेतन आयोगाच्या शिफारशींसह राज्यशासनाने मंजूर केलेली वेतन श्रेणी स्विकारलेली आहे. परंतु कंपनीच्या रजा नियमावलीमध्ये विहित केलेले होते की, कर्मचारी अर्जित रजा (ई एल) व आकस्मित रजा (सी एल) या दोन्ही रजांचे पगाराच्या दीडपट या दराने रोखीकरण करण्यास पात्र आहेत. परंतु कंपनीच्या रजा नियमावलीमध्ये रोखीकरणासाठी भत्त्यांची व्याख्या करण्यात आलेली नाही आणि सिडकोला महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियमावली, १९८१ च्या आधारावर रजेच्या रोखीकरणाचे प्रदान करणे भाग आहे. या नियमावलीमध्ये रजेच्या रोखीकरणासाठी घरभाडे भत्त्याचा समावेश करण्यात आलेला नाही. म्हणून नियंत्रक आणि महालेखापरीक्षक यांचे असे म्हणणे आहे की, घरभाडे भत्ता रजा रोखीकरणामध्ये धरण्यात आल्यामुळे कंपनीला ३.३३ कोटी रुपयांचे नुकसान झालेले आहे.

सिडको ही कंपनी अधिनियम, १९५६ च्या तरतुदीन्वये विधिसंस्थापित झालेली एक कंपनी आहे आणि राज्यशासनाने त्यांच्या ७ नामनिर्देशितांनी धारण केलेल्या आणि अभिवत केलेल्या भाग भांडवलामुळे, कंपनी अधिनियमाचे कलम ६१७ च्या अर्थान्वये सिडको ही एक शासकीय कंपनी आहे. त्याचप्रमाणे सिडकोची नवीन मुंबईच्या नियोजित विकासासाठी एमआरटीपी (महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगर नियोजन) अधिनियम, १९६६ चे कलम ११३ उपकलम ३ ए अन्वये अधिकारांचा वापर करून राज्य शासनाने नवीन शहर विकास प्राधिकरण म्हणून नेमणूक करण्यात आलेली आहे. या ठिकाणी येथे हे नमूद करणे अयोग्य दिसणार नाही, की सिडको ही दुहेरी कायदेशीर अस्तित्व असलेली एक कंपनी आहे. कंपनी अधिनियमाच्या तरतुदीन्वये ती एक शासकीय कंपनी आहे आणि तसेच महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगर नियोजन अधिनियम, १९६६ च्या तरतुदीन्वये नवीन शहर विकास प्राधिकरण आहे.

एक कंपनी या नात्याने सिडको एक स्वायत्त मंडळ आहे आणि त्यांच्या संचालक मंडळास कंपनी अधिनियमांच्या तरतुदीन्वये आणि एमआरटीपी अधिनियम, १९६६ अन्वये अधिकारांचा वापर करून सक्षम प्रशासनासाठी आणि कामकाज पार पाडण्यासाठी नियम, विनियम आणि धोरणे यांची रचना करण्याचे अधिकार सोपविण्यात आलेले आहेत.

सिडकोने आपल्या कर्मचाऱ्यांचे वेतन प्रदान करण्यासाठी ५ व्या वेतन आयोगाच्या शिफारशींचा स्विकार केलेला असताना देखील केंद्र शासकीय, राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना दिल्या जाणाऱ्या सेवानिवृत्ती वेतन आणि इतर लाभ यांसाठी सिडकोचे कर्मचारी पात्र नाहीत, त्याचप्रमाणे सिडकोने देखील महाराष्ट्र नागरी सेवा नियमावली पूर्णपणे स्विकारली नाही. महामंडळाच्या संचालक मंडळाने आपल्या कर्मचाऱ्यांसाठी स्वतःची सेवा नियमावली आणि रजा नियमावली तयार केलेली आहेत. सिडकोने रजा देण्यासाठी आणि रजेच्या रोखीकरणासाठी आपली स्वतःची नियमावली तयार केलेली आहे. या नियमावलीला 'सिडको कर्मचारी रजा नियमावली' असे संबोधित केले जाते. महामंडळाच्या संचालक मंडळाने दिनांक २४ मार्च १९७० रोजीच्या ठराव क्र. ४१ अनुसार या नियमावलीची रचना केलेली होती. ही नियमावली सिडकोच्या प्रारंभापासूनच अंमलात आहे. रजा वेतन प्रदान करण्यासाठी आणि रजेच्या रोखीकरणासाठी प्रदान करावयाचे परिश्रमिक सदरहू नियमावलीमध्ये स्पष्टपणे विषद करण्यात आलेले आहे. संबंधित तरतुदी सुलभतेसाठी पुन्हा सादर करण्यात आलेल्या आहेत.

(१) आकस्मिक रजा : (ii) न वापरलेली आकस्मिक रजा वर्षाखेरीस संपुष्टात येईल, परंतु कर्मचाऱ्यास अशा न वापरलेल्या रजेच्या प्रत्येक दिवसासाठी विशेष परिश्रमिक प्रदान करावे लागेल. विशेष परिश्रमिकाची या दिवसांपर्यंतचे संबंधी कर्मचाऱ्याचे वेतन आणि भत्ते यांच्या दुप्पट प्रमाणात परिगणना करण्यात येईल.

(२) रजा वेतन : (i) संपूर्ण वेतनावरील अर्जित रजा किंवा प्रसुतिरजा किंवा रुग्णता रजा घेणारा कर्मचारी वेतन आणि भत्त्याच्या समतुल्य रजा वेतन घेण्यास पात्र राहील व ही पात्रता जर कर्मचारी रजेवर गेला नसता तर त्याला सदरहू वेतन मिळाले असते अशा स्वरूपामध्ये राहील.

**दिनांक ८ मार्च १९९२ रोजीच्या ठराव क्र. ३१८ अनुसार रजा नियमावलीमध्ये अंशतः सुधारणा करण्यात आली ज्यामध्ये देय असलेल्या पारिश्रमिकाची 'स्पष्टीकरणा' मध्ये व्याख्या करण्यात आलेली आहे.**

**आकस्मिक रजेचे रोखीकरण :**

या नियमावलीच्या उद्देशासाठी 'पारिश्रमिक' याचा अर्थ ज्या वर्षासाठी रजा संपुष्टात आलेली आहे, त्या वर्षाच्या ३१ डिसेंबर रोजी कर्मचाऱ्यास देय असलेले वेतन आणि सर्व भत्ते असा होतो.

**अर्जित रजेचे रोखीकरण :**

या नियमावलीच्या उद्देशासाठी 'पारिश्रमिक' याचा अर्थ ज्या दिवशी अर्जित रजा सुरु झाली त्या दिवसाच्या लगेच पुढील दिवशी अर्जित रजा सुरू झाली त्या दिवसाच्या लगेच पुढील दिवशी कर्मचाऱ्यास देय असलेले वेतन आणि सर्व भत्ते असा होतो.

आगामी तरतुदी स्पष्टपणे असे दर्शवितात की, परिश्रमिकामध्ये वेतन आणि सर्व भत्यांचा समावेश आहे.

जर सिडकोने महाराष्ट्र नागरी सेवेतील वेतन आणि भत्ते विषयीचा नियम स्वीकारला असता तर सिडको कर्मचाऱ्याला सेवा निवृत्ती वेतन आणि अन्य लाभ देणे भाग पडले असते जे सामान्यपणे शासकीय कर्मचाऱ्याला संपूर्णतः दिले जातात, विशिष्ट वस्तुस्थिती लक्षात घेता, सिडकोने कर्मचाऱ्यांना रजा रोखीकरणासाठी दिलेली रक्कम पुर्णपणे समर्थनीय आहे.

सिडको प्रारंभापासूनच आपल्या कर्मचाऱ्यांना वरील मार्गदर्शिकेनुसार रजा वेतन आणि रजेचे रोखीकरण प्रदान करण्यात आलेली आहे.

असे देखील सादर करण्यात येते की, दिनांक १२ डिसेंबर २००७ रोजी आयोजित करण्यात आलेल्या लेखापरिक्षण समितीच्या सभेमध्ये,—

दिनांक १२ डिसेंबर २००७ रोजी महालेखा परीक्षक (वाणिज्यिक) यांचे अधिकारी आणि सिडकोचे अधिकारी यांच्यामध्ये आयोजित करण्यात लेखापरीक्षा समितीच्या सभेचे कार्यवृत्त तयार संदर्भासाठी यासोबत योजण्यात आलेले आहे. निवासी वरिष्ठ लेखापरिक्षण अधिकारी/सिडको यांनी कार्यवृत्त निर्गमित केले प्रस्तुत करण्यात आलेले आहेत.

'कंपनीने असे नमूद केलेले आहे की, रजा रोखीकरणावरील एचआरए/सीसीए चे प्रदान संचालक मंडळाच्या ठरावानुसार करण्यात येते तथापि कंपनीने अन्य शासकीय कार्यालयातील रजा रोखीकरणाची तपासणी करण्यास मान्यता दिलेली आहे.' तथापि, सन २००७-०८ पर्यंतच्या नियंत्रक आणि महालेखापरिक्षक (वाणिज्यिक) अहवालातील परिच्छेद क्र. ३.१ मध्ये, खालीलप्रमाणे असे मुद्रीत करण्यात आलेले आहे की,

**'कंपनी सहमती देते की, कर्मचाऱ्यांकडून अनियमित प्रदानांची हप्त्याहप्त्याने वसुली करण्यासाठी संचालक मंडळासमोर ही बाब सादर करण्यात येईल.'**

सन २००७-०८ पर्यंतच्या नियंत्रक आणि महालेखापरीक्षक (वाणिज्यिक) अहवालातील परिच्छेद क्र. ३.१ मध्ये असे वाटते की, वरीलप्रमाणे लेखापरीक्षा समितीचे कार्यवृत्त नोंदविण्यात आलेले आहे. म्हणून या बाबतीत नियंत्रक आणि महालेखापरीक्षक यांनी केलेले अभिक्षण नम्रपणे वगळण्यात यावे.

१.३ महामंडळाने नमूद केलेल्या कार्यवाहीसंदर्भात शासनाने रजेच्या मंजुरीकरिता आणि रजेच्या रोखीकरणाकरिता सिडकोने त्यांचे स्वतःचे नियम तयार केले आहेत. नियमांची सिडकोच्या प्रारंभापासून अंमलबजावणी होत आहे. हे प्रकरण वित्त विभागाकडे निर्देशित करण्यात आले आणि त्यांच्याकडून अभिप्राय प्राप्त झाल्यानंतर, उचित निर्णय घेण्यात येईल असे अभिप्राय व्यक्त केले.

१.४ "महाराष्ट्र शहर व औद्योगिक विकास महामंडळ" यांनी व नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांच्याकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या अनुषंगाने समितीने नगरविकास विभागाचे प्रधान सचिव तसेच महाराष्ट्र शहर व औद्योगिक विकास महामंडळ यांचे व्यवस्थापकीय संचालक व इतर अधिकारी यांची गुरुवार, दिनांक ३ मार्च २०११ रोजी साक्ष घेतली. महाराष्ट्र शहर व औद्योगिक विकास महामंडळ यांच्या अनियमित रजा रोखिकरणाबाबत महालेखाकारांनी घेतलेल्या आक्षेपाबाबत समिती प्रमुखांनी विभागाचे स्पष्टीकरण विषद करण्याविषयी सांगितले असताना विभागीय प्रधान सचिव यांनी समितीला सांगितले की, "महाराष्ट्र शहर व औद्योगिक विकास महामंडळाने" दिनांक ८ मार्च १९७२ रोजी ठराव पारित केला असून, त्यानुसार वेतन व विशेष भत्ते यांच्या १५० टक्के रजा रोखिकरणाचे प्रदान करावे असा निर्णय आहे. त्यानुसार त्यांना रक्कम अदा केल्या गेल्या आहेत. महालेखाकारांनी घरभाडे भत्त्याचा समावेश रजा रोखिकरणामध्ये करणे चुकीचे असून यापूर्वी या विषयाच्या अनुषंगाने कर्मचाऱ्यांना दिला गेलेला फायदा हा देखील चुकीचा आहे. या घेतलेल्या आक्षेपाबाबत बोलताना विभागीय सचिवांनी सांगितले की, सिडको ही राज्य शासनाची कंपनी असून, कंपनी अधिनियमाखाली त्यांची नोंद झालेली आहे. सिडकोने महाराष्ट्र नागरी सेवा नियमावलीतील सर्व तरतुदी तंतोतंत स्वीकारलेल्या नाहीत. सिडकोने कर्मचाऱ्यांसाठी स्वतःची सेवा नियमावली व रजा नियमावली तयार केली आहे व ती शासन नियमावलीपासून भिन्न आहे. दिनांक १२ डिसेंबर २००७ रोजी लेखापरिक्षण समितीच्या बैठकीत अनियमित प्रदान कर्मचाऱ्यांच्या वसुलीबाबत करण्यात आलेल्या चर्चेबाबत सदर बाब संचालक मंडळासमोर ठेवण्यात येईल, असे नमूद केले आहे, याबाबत विभागाचे म्हणणे काय आहे या प्रश्नाला उत्तर देताना व्यवस्थापकीय संचालक यांनी सांगितले की, घरभाडे व शहर भत्ता यांचे प्रदान संचालक मंडळाच्या यापूर्वीच्या ठरावानुसार करण्यात येते. याबाबत अन्य शासकीय कार्यालयातील रजा रोखिकरणाच्या पद्धतीबाबत तपासणी करण्यासाठी सिडको या कंपनीने मान्यता दिलेली आहे. आपण अनियमित प्रदान केलेली रक्कम वसूल करणार आहात का ? या समिती सदस्यांच्या प्रश्नाला उत्तर देताना व्यवस्थापकीय संचालक यांनी नकारार्थी उत्तर दिले. महालेखाकारांनी आक्षेप घेतल्यानंतर राज्य शासनाची इतर महामंडळे यांच्याकडून नियमावलीबाबत अनुसरण्यात येणाऱ्या कार्यपद्धतीबाबत महाराष्ट्र शहर व औद्योगिक विकास महामंडळ अखत्यारीत असलेल्या नगरविकास विभागामार्फत वित्त विभागाकडे याबाबतच्या अभिप्रायासाठी प्रस्ताव सादर केला असल्याचे विभागीय सचिवांनी एका प्रश्नाला उत्तर देताना स्पष्ट केले. सन १९७२ मध्ये सिडकोने कर्मचाऱ्यासाठी बनविलेले नियमाची राज्य शासनाने १९८१ मध्ये बनविलेल्या महाराष्ट्र नागरी सेवा नियमांबरोबर पडताळणी करण्याचा प्रयत्न केला आहे काय व तसेच शासनाचे नियम आणि शासनाच्या अंगिकृत असलेल्या मंडळाच्या नियमामध्ये साधर्म्य असावे, याबाबत शासनाचे मत काय आहे या प्रश्नाला उत्तर देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, राज्य शासनाने महाराष्ट्र शहर व औद्योगिक विकास

महामंडळास स्थानिक स्वराज्य संस्थेचे अधिकार दिलेले आहेत. त्यामुळे त्यात कोणत्याही प्रकारे शासन स्तरावरून हस्तक्षेप केला जात नाही. परंतु महामंडळाने घेतलेल्या निर्णयाला शासनाची मान्यता असली पाहिजे यानुसार याबाबत नगरविकास विभागाकडून वित्त विभागाकडे प्रस्ताव सादर केले असल्याचे त्यांनी पुन्हा स्पष्ट केले.

१.५ अभिप्राय शिफारशी :

**"महाराष्ट्र शहर व औद्योगिक विकास महामंडळ" हे सुयोग्य व सुनियोजितरित्या नवीन शहर उभारण्याच्या उद्देशाने स्थापन केले असून, ते राज्य शासनाच्या नगर विकास विभागाच्या अंतर्गत येते. राज्य शासनाने आपले उद्दिष्ट साध्य करण्यासाठी स्वतंत्र महामंडळाची निर्मिती केलेली आहे. या महामंडळातील अधिकारी/कर्मचाऱ्यांसाठी स्वतंत्र सेवा व रजा नियमावली आहे. अधिकारी/कर्मचाऱ्यांना रजा रोखिकरणात जादा दराने अनियमीत प्रदान केल्याचा महालेखाकारांनी आक्षेप घेतलेला आहे. या महामंडळाच्या रजा रोखिकरणाविषयी समितीने माहिती घेतली असता या महामंडळाने अधिकारी/कर्मचारी यांना रजा रोखिकरणाबाबत नियमांमध्ये तरतूद केलेली आहे व या नियमानुसार कर्मचाऱ्यांना रजा रोखीकरण करण्यात आलेले आहे. सदर तरतुदीचे स्वरूप राज्य शासनाच्या कर्मचाऱ्यांपेक्षा वेगळे आहे. महामंडळाच्या कर्मचाऱ्यांना राज्य सरकारी कर्मचाऱ्यांना लागू असलेल्या दरापेक्षा जास्त दराने रजा रोखीकरण केले जाते याचा विचार केला असता या महामंडळाने राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना लागू असलेल्या पगार व भत्त्याचा स्वीकार केलेला आहे, तथापि, त्यांना राज्य शासकीय कर्मचाऱ्याप्रमाणे निवृत्तीवेतनाची तरतूद नसल्याची बाब समितीपुढे आली. या अनुषंगाने विचार केला असता महामंडळातील कर्मचाऱ्यांना रजा रोखीकरणाची प्रचलित सवलत असणे समितीस आवश्यक वाटते, तसेच महामंडळात कर्मचाऱ्यांच्या रजा रोखीकरणामध्ये घरभाडे भत्ता धरण्यात येतो की जो राज्य सरकारी कर्मचाऱ्यांच्या बाबतीत धरला जात नाही. घरभाडे भत्ता हा प्रतिपूरक भत्ता असल्याने त्याचा रजा रोखिकरणात समावेश व्हावा किंवा कसे याचा निर्णय राज्य शासन घेईलच, तथापि, यापूर्वी प्रदान झालेल्या रकमेबाबत समिती नमूद करू इच्छिते की, महामंडळात पूर्वीपासूनच रजा रोखिकरणात घरभाडे भत्ता धरण्यात येत होता व लेखापरिक्षणात हा मुद्दा उशिराने उपस्थित झाला आहे. अशा पद्धतीने रजा रोखिकरणाचा लाभ घेतलेले बरेच कर्मचारी निवृत्त झाले असतील वा काही निवृत्तीच्या जवळ आलेले असतील अशा कर्मचाऱ्यांकडे आता उशिराने अतिप्रदान झालेल्या रकमेची वसुली व्यवहार्य ठरू शकणार नाही. मात्र राज्य शासनाने या महामंडळाच्या रजा रोखीकरणात घरभाडे भत्त्याचा समावेश होत नसल्याचा निर्णय घेतल्यास त्याची अंमलबजावणी यापुढील काळात करावी अशी समितीची शिफारस आहे. महामंडळाचे कामाचे एकंदर स्वरूप व अधिकारी/कर्मचारी**

**यांना निवृत्ती वेतन मिळत नसल्याची बाब विचारात घेता या महामंडळातील कर्मचाऱ्यांच्या रजा रोखीकरणाविषयी शासन स्तरावरून सुसंगत निर्णय घ्यावा अशी समिती शिफारस करीत आहे. याप्रकरणी केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यांच्या आत कळविण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

**दोन : वायफळ खर्च**

२.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००७-२००८ च्या (वाणिज्यिक) अहवालातील प्रकरण क्रमांक ३ मधील परिच्छेद क्रमांक ३.२ मध्ये " वायफळ खर्च " यासंबंधात महालेखाकारांनी असे अभिप्राय व्यक्त केले आहेत की, **जमिनीची मालकी नसताना कंत्राटप्रदान केल्यामुळे रुपये ९३ लाखाचा वायफळ खर्च झाला होता.**

सेक्टर १७ मधील मलनिस:रण पंप हाऊस ते सेक्टर-९ मधील खारघर येथील मलनिस्सारण प्रक्रिया संयंत्र येथे पाईपलाईन टाकणे व मलनिस्सारण प्रक्रिया संयंत्र येथे पाईपलाईन टाकणे व मलनिस्सारण मुख्य पाईपलाईनला जोडण्याच्या कामाचे कंत्राट कंपनीने कंत्राटदाराला (एस.एस.खिलारी) त्यांच्या कमीत कमी निविदा दिलेल्या रुपये १.९६ कोटी किमतीला प्रदान (फेब्रुवारी, २००४) केले होते. काम फेब्रुवारी, २००५ अखेर पूर्ण करावयाचे होते. कंत्राटदाराने १,७२० रनींग मीटर (आरएमटी) पीएससी पाईप लाईन टाकण्याचे रुपये ९३ लाख किंमतीचे काम पूर्ण केले होते. कंपनी कंत्राटदाराला जमीन उपलब्ध करून देऊ न शकल्यामुळे ८७५ आरएमटी पाईपलाईन व एमएस साकेत टाकण्याचे काम अपूर्ण राहीले होते. कंपनीने करार मुदती आधी (सप्टेंबर, २००५) मध्ये रद्द केले.

लेखापरीक्षणाच्या वेळी असे निदर्शनास आले की (नोव्हेंबर, २००७) ज्या जागेवर पाईप लाईन टाकायची होती त्या जमिनीचा काही भाग महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी) या दुसऱ्या राज्य शासनाच्या महामंडळाचा होता व फेब्रुवारी, २००४ मध्ये कामाचा आदेश देण्यापूर्वी जमिनीच्या उपलब्धतेची कंपनीने खात्री करून घेणे आवश्यक होते. अशारितीने कामाचा आदेश देण्यापूर्वी जमिनीच्या उपलब्धतेची खात्री न करून घेतल्यामुळे कंत्राट मुदतीपूर्वी बंद करावे लागले व प्रकल्पात करण्यात आलेला रुपये ९३ लाखांचा खर्च ऑक्टोबर, २००५ पासून अडकून पडला होता व त्या रकमेवर झालेले व्याजाचे नुकसान रुपये ३२.०९ लाख एवढे काढण्यात आले होते.

कंपनीच्या अधीक्षक अभियंत्याने हे तथ्य स्वीकारत आपल्या उत्तरात (जानेवारी, २००८) म्हटले होते की, ते कंपनीच्या जमीन विभागावर विसंबून राहिले होते की, ज्याने जमीन उपलब्ध असल्याचे प्रमाणित केले होते. दोन संघटनांमधील जागेची अदलाबदल ही वेळकाढू बाब असल्यामुळे कंत्राट

मुदतीपूर्वी बंद करण्यात आले होते. उत्तरात पुढे असेही म्हटले होते की, ही पाईप लाईन सेक्टर-१६/ १७ मधील मलनिस्सारण पंप गृहाकडे उलट्या दिशेने वाहून नेण्यासाठी वापरण्यात येईल. परंतु हे काम सप्टेंबर, २००५ मध्ये परिव्यक्त केल्यानंतर तीन वर्षांचा कालावधी जाऊन देखील कंपनीने हे काम पूर्ण करण्याचे व पाईपलाईन वापरण्याचे कोणतेही निश्चित नियोजन केले नव्हते. ही बाब शासनाला/ व्यवस्थापनाला कळविण्यात (एप्रिल, २००८) साली होती. त्यांचे उत्तर प्रलंबित होते (डिसेंबर, २००८).

२.२ या प्रकरणी समितीला पाठविलेल्या स्पष्टीकरणात्मक लेखी ज्ञापनात महामंडळाने खुलासा करताना असे नमूद केले की, सिडकोने एकूण १.७२ कि.मी. लांबीच्या पाईपलाईनची मांडणी करण्याची आखणी केलेली आहे. त्यापैकी कराराअंतर्गत एमआयडीसीने घेतलेल्या हरकतीमुळे फक्त २५० आरएमटी पाइपलाईन टाकण्याचे काम अपूर्ण राहिलेले होते. ही २५० आरएमटी पाईपलाईन टाकण्याचे एमआयडीसीने या कारणावर हरकत घेतलेली होती की, ही जमीन एमआयडीसीच्या मालकीची आहे.

अलीकडेच, सिडकोने काम प्रगतिपथावर असलेल्या भूमापन क्र. ८९ ची अदलाबदल करताना दुसरा भूखंड देऊन एमआयडीसीच्या भूमापन क्र. १३२ खालील भूखंडांची अदलाबदल केलेली आहे. भूमापन क्र. १३२ खालील भूखंडाच्या कडेने एक नवीन पीएससी पाईपलाईन टाकण्यात आलेली आहे. हा भूखंड सिडकोच्या मालकीचा आहे आणि म्हणून आता या क्षेत्रामध्ये मलप्रवाह वाहून नेण्यासाठी पाईप लाईन टाकता येईल. तसेच, यापूर्वीदेखील सिडकोने विविध प्रकारच्या विकास कामांसाठी एमआयडीसीच्या जागेचा वापर केलेला आहे आणि यादृष्टीने अतिशय सुसाध्य तसेच आर्थिकदृष्ट्या परवडण्याजोग्या अशा एमआयडीसीच्या जागेतून पाईपलाईन टाकण्यासाठी प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता. खारफुटीच्या झाडांची या कामामध्ये छाटणी करण्याचा अंतर्भाव नसल्यामुळे पर्यावरण निवारा प्रमाणपत्र घेण्याची आवश्यकता नव्हती आणि ही जमीन सीआरझेडच्या बाहेर होती. न्यायालयाने दिनांक ६ ऑक्टोबर २००५ पासून खारफुटी क्षेत्रापासून ५० मीटर अंतरापर्यंत काम करण्यास प्रतिबंध केलेला आहे. कामाचे नियोजन करण्याच्या समयी अशा प्रकारचा कोणताही मनाई हुकूम नव्हता तसेच न्यायालयाने नुकतेच न्यायालयीन आदेश क्र. ०४१९२९८, दिनांकित २८ जुलै २००८ अनुसार हा मनाई हुकूम रद्द केलेला आहे.

पुरोबंधाची (हक्क नष्ट करण्याची) हमी घेण्यात आलेली होती. कारण न्यायालयीन आदेश अंतरिम कालावधीमध्ये देण्यात आलेला होता, जो प्रस्तावाची मांडणी करताना दृष्टीसमोर ठेवण्यात आला नव्हता. त्याचप्रमाणे या नियम कालावधीमध्ये पाईपलाईन टाकण्यात येईल त्यामुळे संदरहू कालावधीदरम्यान पाईपलाईनवर झालेला रुपये ९३ लक्ष रुपयांचा खर्च वायफळ झालेला आहे, असे म्हणता येणार नाही आणि पाईपलाईन टाकण्यासाठी प्रस्ताव सुरू करण्यात आलेला आहे.

ही वस्तुस्थिती आहे की, न्यायालयाने खारफुटीपासून ५० कि.मी. अंतरापर्यंतच्या क्षेत्रामध्ये विकास करण्यास मनाई हुकूम लागू केल्यामुळे कंपनीने प्रस्तावित एसटीपी सेक्टर ९ पासून सेक्टर १६ पर्यंत आहे. न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन होऊ नये म्हणून यापूर्वीचे बांधकाम सोयीचे करण्यासाठी एसटीपी सेक्टर १६ पर्यंत आहे.

वर सादर केल्याप्रमाणे अंतरिम कालावधीतील उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशामुळे कराराच्या पुरोबंधाची आवश्यकता होती. रु. ९३ लक्षचा खर्च विफल गेला असे म्हणणे योग्य होणार नाही. कारण या कामामुळे एकूण प्रभागीय/क्षेत्रीय/शहर स्तरावरील पायाभूत सुविधा कामांचा अविभाज्य असा भाग तयार झालेला आहे. मार्च, २००९ पर्यंत उर्वरित पाईपलाईन टाकण्याचे आणि खारघर प्रभागातील सायन-पनवेल महामार्गाच्या पश्चिम क्षेत्रामध्ये निर्माण होणा-या मलप्रवाहाचा सेक्टर १६, खारघर मधील एसटीपीपर्यंत उपसा करण्यासाठी पाईपलाईन टाकण्याचे जे उर्वरित काम उच्च न्यायालयाच्या अंतरिम कालावधीतील आदेशामुळे थांबविण्यात आलेले होते, ते काम पूर्ण झाल्यानंतर संपूर्ण पाईपलाईन टाकण्याचे प्रस्तावित करण्यात आलेले आहे. अनपेक्षित अशा न्यायालयीन निदेशामुळे पुरोबंध झालेला आहे आणि हा पुरोबंध जमिनीच्या मालकीअभावी झालेला नाही.

मेसर्स एस.एस. खिलारी यांना दिलेल्या कराराच्या पुरोबंधानंतर, उर्वरित मलप्रवाह मार्गासाठी नवीन अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले होते. यापूर्वी मांडणी केलेल्या मलप्रवाहाच्या मार्गाचा वापर करून सेक्टर १७ मधील मुख्य पंप हाऊसपर्यंत मलप्रवाहाचा उपसा करता येईल. या उद्देशासाठी प्रशासकीय मंजुरी प्राप्त केल्यानंतर निविदा मागविण्यात आल्या होत्या आणि मेसर्स भगवती इंजिनिअरिंग कंपनीला उर्वरित मलप्रवाह मार्गाचे काम देण्यात आलेले आहे. कार्य प्रगतिपथावर आहे आणि हे काम दिनांक २१ मार्च २०११ पर्यंत पूर्ण करण्याची अट घालण्यात आलेली आहे. सध्या एजन्सीने जवळजवळ ४० टक्के प्रगती केलेली आहे. कामाची व्याप्ती दर्शविणारा आराखडा सोबत जोडण्यात आलेला आहे.

म्हणून यापूर्वी निष्पादित केलेल्या कामाप्रमाणे कोणताही खर्च वाया जाण्यासारखा नाही आणि त्याचा पूर्णपणे वापर होईल.

२.३ महामंडळाने व्यक्त केलेल्या अभिप्रायाशी शासनाने सहमती दर्शविली आहे. सिडकोने १.७२ कि.मी. लांबीच्या एकूण पाईपलाईन टाकण्याचे नियोजित केले आहे. एमआयडीसीच्या आक्षेपामुळे यापैकी २५० कि.मी. लांबीची पाईपलाईन टाकता येणार नाही. खारफुटीपासून ५० मी. अंतरावरील क्षेत्रामध्ये काम करण्यास न्यायालयाने प्रतिबंध केला आहे. न्यायालयाने बंदी आणल्यामुळे सिडकोने प्रस्तावित STP क्षेत्र ९ पासून क्षेत्र १६ येथे स्थानांतरित केले आहे. सिडकोने एमआयडीसीच्या सदरहू

भूखंडाची एमआयडीसीला दुसरा भूखंड देऊन अदलाबदल केली. सिडकोने उर्वरित पाईपलाईन टाकण्याचे कंत्राट प्रदान केले असून, हे काम सध्या सुरू आहे आणि हे काम पूर्ण होण्याची कराराविनिष्ट तारीख २१ मार्च २०११ ही आहे. अशा प्रकारे सिडकोकडून देण्यात आलेल्या अभिप्रायांचा कृपया स्वीकार करण्यात यावा.

२.४ " महाराष्ट्र शहर व औद्योगिक विकास महामंडळ " व नगरविकास विभाग महाराष्ट्र शासन यांच्याकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या अनुषंगाने समितीने नगरविकास विभागाचे प्रधान सचिव तसेच महाराष्ट्र शहर व औद्योगिक विकास महामंडळ यांचे व्यवस्थापकीय संचालक व इतर अधिकारी यांची गुरुवार, दिनांक ३ मार्च २०११ रोजी साक्ष घेतली. " महाराष्ट्र शहर व औद्योगिक विकास महामंडळाने " सेक्टर १७ मधील मलनिस्सारण पंप हाऊस ते सेक्टर ९ मधील खारघर येथील मलनिस्सारण प्रक्रिया केंद्र या ठिकाणी मलनिस्सारण मुख्य पाईपलाईन जोडण्याचे काम फेब्रुवारी, २००४ सुरू केले होते. सदर पाईपलाईनची लांबी २४७० मीटर इतकी होती. त्यातील १७२० मीटर इतकी पाईपलाईन टाकण्याचे काम पूर्ण करण्यात आले होते. पाईपलाईन जोडणीमधील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या अखत्यारितील असलेल्या भागातून सदर पाईपलाईन टाकण्याची मंजुरी न घेतल्याने सदर बांधकाम पूर्ण होऊ शकले नाही. त्यामुळे सन २००४ ते मार्च, २०१० पर्यंत त्यावर करण्यात आलेला खर्च निष्फळ गेला होता, या महालेखाकारांनी घेतलेल्या आक्षेपाबाबत विभागाच्या प्रधान सचिवांनी विवेचन केले की, मा. उच्च न्यायालयाने सदर पाईपलाईन जाणा-या भागातील तिवरांच्या जंगलाबाबत ५० मीटर अंतराच्या कामाबद्दल प्रतिबंध केला होता त्यामुळे त्यातील मूळ आराखड्यात बदल करावा लागला व पाईपलाईनची दिशा बदलावी लागली. सेक्टर १६ मधील भागामध्ये मलनिस्सारण प्रक्रिया संयंत्र बांधावे लागले. त्यामुळे दुसरे अंदाजपत्रक तयार करून बाजारातील अत्याधुनिक पाईपलाईनची खरेदी करून काम पूर्ण करण्याचा निर्णय घेतला व त्यानुसार मार्च, २०१० रोजी सदर काम ठेकेदाराला देण्यात आले असून, मार्च, २०११ पर्यंत संपूर्ण काम पूर्ण होईल. यापुर्वीच्या कामाचे अंदाजपत्रक १.९६ कोटी रुपयांचे होते, परंतु सुधारित अंदाजपत्रकानुसार २.८० कोटी रुपयांचे झालेले आहे. सन २००३ मधील काम सन २०११ पर्यंत पूर्ण न होण्यामागे नियोजन विभागातील अधिका-यांची कर्तव्यशुन्यता दिसते या समिती प्रमुखांच्या प्रश्नाला उत्तर देताना विभागीय सचिवांनी याबाबत नियोजन अधिका-यांकडून योग्य ती कारवाई न झाल्याचे मान्य केले. याबाबत " महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ " व " महाराष्ट्र शहर व औद्योगिक विकास महामंडळ " या दोघांमध्ये समन्वयाने काम करण्याची आवश्यकता असताना घाई-गर्दीत " महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची " परवानगी राहून गेली असल्याचे वाटते असे त्यांनी साक्षी दरम्यान स्पष्ट केले.

**२.५ अभिप्राय व शिफारशी :**

**महाराष्ट्र शहर व औद्योगिक विकास महामंडळातर्फे नवीन भागामध्ये शहर विकसीत करीत असताना नियोजन हा महत्त्वाचा घटक आहे. प्रस्तुत आक्षेपाच्या अनुषंगाने मलनिस्सारण, पाईपलाईन इत्यादी पायाभुत सुविधा स्थापित करावयाच्या कामामध्ये महाराष्ट्र शहर व औद्योगिक विकास महामंडळाच्या कामामध्ये नियोजन विभागाकडून दुर्लक्ष झाल्याचे विभागीय सचिवांनी देखील साक्षीच्या वेळी मान्य केले आहे. नियोजनाअभावीच प्रस्तावित काम बराच कालावधीपर्यंत पूर्ण होऊ शकलेले नाही. परिणामी या कामावर खर्च करण्यात आलेला निधी निष्फळ गेला होता. शासनाच्याच उपक्रम असलेल्या महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या अखत्यारितील जागेतून करावयाच्या कामासाठी सिडकोकडून त्यांची पूर्व परवानगी देखील घेतली गेली नव्हती. त्यामुळे त्यांच्याकडून प्रत्यक्ष कामाच्या वेळी प्रतिबंध केला गेला. या प्रकरणी दोन महामंडळातील कामामध्ये समन्वयाचा अभाव देखील दिसून येतो. भविष्यात अशा कामामध्ये शासनाच्या अखत्यारितील शासकीय उपक्रमांनी योग्य तो समन्वय ठेवावा. त्यामुळे कालापव्यय टळून प्रकल्पाच्या खर्चात बचत होऊ शकेल. विकास कामे करताना नैसर्गिक तसेच न्यायीक अडचणी देखील उद्भवू शकतात याचा प्राथम्याने विचार केला गेला पाहिजे. यासाठी कार्यतत्पर राहून पूर्ण कार्यक्षमतेच्या समन्वयाने नव्याने विकसीत करावयाच्या शहराचे काम आदर्शपूर्ण होईल. यादृष्टीने शासनाने तसेच महामंडळाने भविष्यकाळात दक्षता घ्यावी, अशी समितीची शिफारस आहे. याप्रकरणी केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यांच्या आत कळविण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

## शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ

### एक : अवजारे संचाची खरेदी

**३.१** भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००७-२००८ च्या (वाणिज्यिक) अहवालातील प्रकरण क्रमांक ३ मधील परिच्छेद क्रमांक ३.१६ मध्ये "अवजारे संचाची खरेदी" या संबंधात महालेखाकारांनी असे अभिप्राय व्यक्त केले आहेत की, **" शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ, नाशिक यांनी अनुदान आधारावर अवजार संचाचे वितरण करण्याबाबत शासनाची मान्यता न घेता अवजार संचाची अग्रिम खरेदी केल्यामुळे विनावापर पडून राहिलेल्या अवजारे संचावर रु. ३५.५८ लाखांचा विफल खर्च झाला होता."**

कंपनी आदिवासी जमातीच्या सामाजिक व आर्थिक उन्नतीसाठी कार्यरत आहे. आदिवासी जमातीमध्ये उद्योगशीलता नैपुण्य वाढविण्यासाठी व त्यांना स्वयंरोजगारासाठी तयार करण्यासाठी कंपनी त्यांना

दुचाकी वाहने दुरुस्ती, टी. व्ही., रेडिओ व घरगुती उपकरणे दुरुस्ती, शिवणकाम इत्यादी धंद्यासाठी प्रशिक्षण देते. प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर कंपनीने लाभधारकांना प्रथमतः कर्जाऊ आधारावर व नंतर योजनेच्या मिळणाऱ्या जास्तीत जास्त रु. ७,५०० अनुदानाशी समायोजित करावयाच्या आधारावर अवजारे संच वितरित करण्याचे प्रस्तावित केले होते. राज्य शासनसुद्धा अशाच योजनांची अंमलबजावणी आदिवासी विभागामार्फत करते ज्यामध्ये असे अवजारे विविध कार्यक्रमांतर्गत १०० टक्के अनुदान तत्त्वावर म्हणजेच लाभधारकांना मोफत वाटप करीत होते. कंपनीने ऑगस्ट, २००६ पर्यंत २,७३२ लाभधारकांना प्रशिक्षण दिले होते.

कंपनीने मंजूर केलेल्या (सप्टेंबर, २००६) योजनेनुसार प्रशिक्षणार्थींना अवजारे संच रुपये ७,५०० पर्यंत मिळणाऱ्या अनुदानापर्यंत कर्जाऊ या आधारावर द्यावयाचे होते व उर्वरित रक्कम लाभधारकांनी सोसायची होती. परंतु ही योजना शासनाच्या मंजुरी (आदिवासी विकास विभाग) अधीन होती. लेखा परिक्षण छाननीत असे निदर्शनास आले की, (जुलै, २००७) शासनाची मंजुरी प्रलंबित असतांनाही कंपनीने डिसेंबर, २००६ ते मार्च, २००७ या कालावधीमध्ये लाभधारकांना वितरित करण्यासाठी रुपये ४१.८२ लाख किमतीचे ७६९ अवजारे संच खाजगी संस्थेकडून खरेदी केले होते. अवजारे कर्जाऊ पद्धतीने संवितरित करण्यासाठी प्रशिक्षणार्थींना कर्जाचे अर्ज व कागदपत्रे सादर करणे आवश्यक होते ते लाभधारकांना स्वीकाहार्य नव्हते. कंपनीच्या या योजनेला मंजुरी मिळाली नव्हती व रुपये ४१.८२ लाख किंमतीच्या खरेदी केलेल्या ७६९ अवजारे संचापैकी (आठ प्रकारच्या व्यापार/ट्रेडसाठी) अवजारे रुपये ३५.३८ लाख किमतीचे ६४२ अवजारे संच (एकूण अवजारे संचाच्या ८३ टक्के) संवितरित करण्यात आले नव्हते व ते कंपनीकडे विनावापर पडून राहिले होते (जून, २००८).

व्यवस्थापनाने लेखा परिक्षण पृच्छेला उत्तर देताना म्हटले (जून, २००८) होते की, आदिवासी विकास विभाग अशा प्रकारचे अवजारे संच १०० टक्के अनुदान आधारावर वितरित करीत होते तर कंपनी सुरुवातीला हे अवजारे संच लाभधारकांना कर्जाऊ आधारावर वितरित करीत असल्यामुळे लाभधारक या अवजारे संचाची पोहचवणी स्वीकारण्यास इच्छुक नव्हते.

हे तथ्य तसेच शिल्लक राहते की कंपनीने एकतर अवजारे संचाची आवश्यकता लाभधारकांकडून अग्रिमरित्या निर्धारित केली नव्हती किंवा आदिवासी विभाग अशीच योजना राबवित होती त्यात अवजारे संच मोफत वाटप करण्यात येते. त्यानुसार आपली योजना राबविली नव्हती परिणाम स्वरूप योजनेचे उद्दिष्ट साध्य झाले नव्हते व रुपये ३५.३८ लाखांचा निधी न वापरलेल्या अवजारे संचामध्ये अडकून पडला होता. ही बाब शासनाला/व्यवस्थापनाला कळविण्यात (जुलै, २००८) आली होती, त्यांचे उत्तर प्रलंबित होते (डिसेंबर, २००८).

३.२ याप्रकरणी समितीला पाठविलेल्या स्पष्टीकरणात्मक लेखी ज्ञापनात महामंडळाने खुलासा करताना असे नमूद केले की, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ यांचेमार्फत दिनांक १५ ऑगस्ट २००६ पासून मिटकॉन यांच्या सहकार्याने राज्यभर शाखा कार्यालय पातळीवर लाभार्थ्यास विविध कर्ज योजनेसाठी प्रशिक्षण सुरू करण्यात आले होते. उदा. द्रोण, पत्रावळी तयार करणे, दुग्धजन्य पदार्थ, बेकरी उत्पादने तयार करणे, डिजिटल फोटोग्राफी, अन्न प्रक्रिया, टी.व्ही., टेप दुरुस्त करणे, मोबाईल दुरुस्ती, नागली प्रक्रिया, अगरबत्ती तयार करणे, मुरमुरे पोहे प्रक्रिया, गांडूळ खत निर्मिती, टू-व्हीलर रिपेअरिंग, घरगुती विद्युत उपकरणाची दुरुस्ती इ. व्यवसायासाठी प्रशिक्षण सुरू करण्यात आले होते. प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांना स्वतंत्र व्यवसाय सुरू करण्यासाठी रुपये २५,००० पर्यंत जास्तीत जास्त कर्ज उपलब्ध करून दिले जाणार होते. तसेच टूलकिटची खरेदी लाभार्थ्यास शबरी महामंडळामार्फत खरेदी व कर्जाची रक्कम रुपये ७,५०० पेक्षा कमी असेल तर अशा लाभार्थ्यांस १०० टक्के अनुदान देण्यात यावे. तेव्हा याबाबतीत टूलकिट खरेदी शबरी महामंडळामार्फत तसेच आदिवासी लाभार्थ्यांस जास्तीत-जास्त रु. २५,००० कर्ज मंजूर करून त्याचप्रमाणे प्रत्येक लाभार्थ्यास रुपये ७,५०० अनुदान देणेबाबतचा ठराव महामंडळाच्या संचालक मंडळाच्या सभेत दिनांक १२ सप्टेंबर २००६ रोजी ठराव क्रमांक २ नुसार पारित झालेला आहे.

सन २००६-०७ या वर्षामध्ये महामंडळ विविध कर्ज व्यवसायासाठी २७६२ लाभार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात आले आहे. दरम्यानच्या काळामध्ये महामंडळाने कौशल्य व उद्योजकता प्रशिक्षण कार्यक्रमासाठी टुलकिट अनुदान प्रति लाभार्थी रुपये ७,५०० प्रमाणे २१०० लाभार्थ्यांसाठी रुपये १५७.५० लक्ष रकमेचा प्रस्ताव राज्य शासनास दिनांक २८ ऑगस्ट २००६ रोजी पाठविला होता. प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर लाभार्थीना अवजारे संच वाटप करणे अपेक्षित होते. या संदर्भात दिनांक १२ सप्टेंबर २००६ चा ठराव क्रमांक २ पारित झाल्यानंतर शासनाकडे दिनांक १ डिसेंबर २००६, २३ जुलै २००७ च्या पत्रान्वये पाठपुरावा करण्यात आला होता. तसेच दिनांक १५ मार्च २००८ च्या शासन निर्णयात पाठपुराव्याची दखल घेऊन अनुदान निर्गमित करतांना शासनाने शबरी महामंडळाची अवजारे संचाची मागणी शासन निर्णयाच्या प्रस्तावात समाविष्ट केली होती. तथापि अद्यापर्यंत शासनाकडून निधी प्राप्त झालेला नाही.

प्रशिक्षण प्राप्त लाभार्थ्यांना सदर टूलकिट हे अनुदान स्वरूपात हवे आहे. त्यामुळे प्रशिक्षण लाभार्थी कर्जस्वरूपात टूलकिट घेण्यास तयार नसल्यामुळे महामंडळाने इतर पात्र लाभार्थ्यांना कर्ज स्वरूपात वाटपाचे कामकाज हाती घेतले असून सदरचे कामकाज शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळामार्फत एक महिन्याचे आत पूर्ण केले जाईल. खरेदी केलेल्या एकूण टूलकिटची रुपये ४१.८२ लाखांची देयके खालीलप्रमाणे अदा केलेली आहेत. दिनांक १६ सप्टेंबर २००६ एकूण खरेदीच्या ५५ टक्के

रुपये २३.०० लाख, दिनांक ४ नोव्हेंबर २००६ एकूण खरेदीच्या २५ टक्के रुपये १०.४५ लाख व दिनांक ३० जानेवारी २००७ एकूण खरेदीच्या २० टक्के रुपये ८.३७ लाख.

शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळामार्फत खरेदी केलेल्या टुलकिटची सद्यःस्थिती तक्ता सोबत जोडल्याप्रमाणे आहे.

**शबरी महामंडळाने खरेदी केलेल्या टुलकिटची सद्यःस्थिती खालीलप्रमाणे आहे :**

| | | | | शिल्लक असलेले टुलकिट | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अ. क्र | टुलकिट प्रकार | खरेदी टुलकिट संख्या | वाटप झालेले टुलकिट संख्या | एकूण शिल्लक टुलकिट संख्या | प्रति नग टुलकिटचे दर (रुपयांत) | शिल्लक टुलकिट्सची एकूण रक्कम (रुपये) |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
| १. | मोबाईल रिपेअर | १२० | २७ | ९३ | ६६३४ | ६१६९६२ |
| २. | टी.व्ही. टेप दुरुस्ती | १७९ | २७ | १५२ | ९३४ | १४१९६८ |
| ३. | टूव्हीलर दुरुस्ती | ११० | १७ | ९३ | २८३४ | २६३५६२ |
| ४. | घरगुती विद्युत उपकरणांची दुरुस्ती. | ६० | २ | ५८ | ९७४ | ५६४९२ |
| ५. | दुग्धजन्य पदार्थ प्रक्रिया | ६० | २६ | ३४ | ५८३४ | १९८३५६ |
| ६. | नागली प्रक्रिया | ६० | १८ | ४२ | ४५३४ | १९०४२८ |
| ७. | पेपर द्रोण पत्रावळी | १४० | १० | १३० | १३६३४ | १७७२४२० |
| ८. | गांडूळ खतनिर्मिती | ४० | ० | ४० | ७९३४ | ३१७३६० |
| | एकूण . . | ७६९ | १२७ | ६४२ | | ३५५७५४८ |

**३.३ : महामंडळाने नमूद केलेल्या कार्यवाहीबाबत शासनाने पुढीलप्रमाणे अभिप्राय व्यक्त केले आहेत :—**

शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाने दिनांक १५ ऑगस्ट २००६ पासून मिटकॉन यांच्या सहकार्याने आदिवासी लाभार्थ्यांना विविध कर्ज योजनेसाठी प्रशिक्षण देण्याच्या कार्यक्रमाला शासनाची मान्यता देण्यात आली नव्हती तसेच विभागामार्फत प्रशिक्षणाच्या व उत्पन्न वाढीच्या योजना ८५ टक्के

ते १०० टक्के अनुदान तत्त्वावर प्रत्यक्षात राबविण्यात येत होत्या. त्यामुळे महामंडळामार्फत टुलकिट खरेदी करून प्रशिक्षित लाभार्थ्यांना रु. ७५०० पर्यंत मिळणाऱ्या अनुदानापर्यंत कर्ज स्वरूपात अवजार संच वितरीत करण्याच्या योजनांना शासनाने मान्यता दिलेली नाही. सदरची योजना महामंडळाच्या संचालक मंडळाच्या सभेमध्ये ठराव पारित करून सुरू करण्यात आली होती. या प्रकरणात झालेल्या अनियमिततेस जबाबदार म्हणून शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाचे तत्कालीन व्यवस्थापकीय संचालक श्री. पराग जैन, भा.प्र.से. व महामंडळाचे संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचे विरुद्ध चौकशी करून शिस्तभंग विषयक कार्यवाही करण्याबाबत प्रस्तावित केले आहे.

३.४ समितीला मिळालेल्या लेखी माहितीच्या अनुषंगाने समितीने आदिवासी विकास विभागाचे प्रधान सचिव तसेच महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक यांची मंगळवार, दिनांक ८ मार्च २०११ रोजी साक्ष घेतली. शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाने अवजार संचाचे वितरण करण्याबाबत शासनाची मान्यता न घेताच संचाची अग्रिम खरेदी केली व ती विनावापर पडून राहिल्यामुळे जवळ-जवळ रु. ३५.५८ लाखाचा खर्च निष्फळ झाला होता. या महालेखाकाराच्या मूळ आक्षेपाबाबत महामंडळाने माहिती स्पष्ट करावी, अशी मा. समिती प्रमुखांनी सूचना केल्यानंतर महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक यांनी सांगितले की, सन २००६ पासून मिटकॉन यांच्या सहकार्याने राज्यभरातील शाखाकार्यालये पातळीवरती लाभार्थ्यांसाठी विविध कर्ज योजनेसाठी प्रशिक्षण सुरू केले होते व त्यामध्ये द्रोण, पत्रावळी तयार करणे, दुग्ध जन्य पदार्थ, बेकरी उत्पादने, डिजिटल फोटोग्राफी, अन्नप्रक्रिया, टी.व्ही., टेप रेकॉर्ड, मोबाईल दुरुस्ती इत्यादी व्यवसायासाठी प्रशिक्षण सुरू केले होते. शासनाची मान्यता न घेता अनुदान आधारावर अवजार संचांची खरेदी का करण्यात आली, या मा. समिती प्रमुखांच्या प्रश्नाला उत्तर देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, अनुदान आधारावर संचांचे वितरण करण्याबाबतच्या योजनेला शासनाची मान्यता घेणे आवश्यक होते, व ती घेतली नाही ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे या प्रकरणाबाबत त्यावेळेच्या संबंधित अधिकाऱ्यांची विभागीय चौकशी करण्यासंदर्भात आदेश देण्यात आलेले आहेत. विभागीय चौकशी करण्यासाठी सन २००६ ते २०११ इतका कालावधी का लागला ? या मा. समिती प्रमुखांच्या अन्य प्रश्नाला उत्तर देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, भारतीय प्रशासनिक सेवेतील (आय.ए.एस.) विभागीय चौकशी करण्याचे अधिकार सामान्य प्रशासन विभाग यांना असल्यामुळे सदर प्रस्ताव सामान्य प्रशासन विभागाकडे पाठविण्यात आलेला आहे. सदर अनियमित प्रकरणातील खरेदी प्रक्रियेच्या नस्तीचा शोध घेतला असता सदर नस्ती श्री. वाणी म्हणून सेवानिवृत असलेले महामंडळाचे अधिकारी यांच्या निवासस्थानी सापडली असल्यामुळे यासंदर्भात अधिक चौकशी करून त्यांच्या विरुद्ध एफ.आय. आर. नोंदविण्यात आला आहे. असेही उत्तरादाखल विभागीय सचिवांनी स्पष्ट केले. यासंदर्भात वेळेवर चौकशी होऊ शकली नाही ही वस्तुस्थिती त्यांनी मान्य केली.

प्रशिक्षण देण्यात आलेल्या लाभधारकांना विविध कर्ज योजनेसाठी प्रशिक्षण तसेच अवजारे संच देण्याचा निर्णय संचालक मंडळाच्या सभेमध्ये पारित झाला. परंतु त्यास शासनाची मान्यता न घेता लाभार्थ्यांसाठी अवजारे संचाची खरेदी केली यापूर्वी १०० टक्के अनुदानावर शासनाकडून अवजारे संच देण्याची योजना असल्यामुळे लाभार्थ्यांमध्ये संभ्रम निर्माण झाला व त्यामुळे अनुदान तत्त्वावर अनुदान घेण्यासाठी कोणीही लाभार्थी पुढे आले नाहीत. त्यामुळे बेकायदेशीररित्या खरेदी करण्यात आलेले संच बराच कालावधीसाठी म्हणजे जानेवारी २०११ पर्यंत तसेच पडून होते हे समितीला साक्षीच्यावेळी निदर्शनास आले. विभागीय सचिवांनी असे स्पष्ट केले की, महामंडळ स्तरावरिल काही योजना एक वर्षासाठी बंद केलेल्या आहेत. खरेदी प्रक्रियेच्यावेळी राज्य शासनाकडून वित्तीय सल्लागार म्हणून नेमण्यात आलेल्या महामंडळाच्या संबंधित अधिकाऱ्यांकडून मान्यता घेतली होती काय या समिती सदस्यांच्या प्रश्नाला उत्तर देताना या प्रकरणाबाबत योग्य ती चौकशी करून पुढील कारवाई केली जाईल असे विभागीय सचिवांनी सांगितले. मा. समिती प्रमुखांनी विभागीय सचिवांच्या निदर्शनास आणले की, महामंडळामधील वरिष्ठ अधिकारी योग्य प्रकारे काम करतात की नाही, तसेच भारतीय प्रशासन सेवेतील अधिकारी यांनी कायदेशीर बाबीबाबत उद्‌भवणाऱ्या समस्या संचालक मंडळाच्या निदर्शनास आणून महामंडळाकडून राबविल्या जाणाऱ्या योजना तळा गाळातील लोकापर्यंत पोहचतात की नाही, यावर नियंत्रण ठेवण्याचे काम त्यांच्याकडून केले जाते काय ? या समिती सदस्यांच्या प्रश्नाला उत्तर देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, महामंडळाचे अधिकारी शासनाला योग्य तो अहवाल देत नाहीत. बेकायदेशीर बाबी जर महामंडळ स्तरावर होत असतील तर त्या शासन स्तरावर निदर्शनास आणणे अत्यंत हिताचे असते, पण त्या आणून दिल्या जात नाहीत, ही वस्तुस्थिती असून, महामंडळावर देखील शासनाचे जेवढे नियंत्रण असावयास पाहिजे ते देखील नाही असे सांगितले. सन २००६ मध्ये खरेदी करण्यात आलेल्या अवजार संचांचे वाटप सद्यःस्थितीत कर्जाच्या स्वरुपात करण्यात येत असल्याचे त्यांनी बैठकीच्या वेळी स्पष्ट केले.

### ३.५ अभिप्राय व शिफारशी :

**शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाने लाभार्थ्यांना प्रशिक्षण देऊन अनुदान तत्त्वावर अवजार संचाचे वितरण करण्याचा निर्णय संचालक मडळाच्या बैठकीमध्ये घेतला होता. सदर निर्णयास शासनाची मंजुरी घेणे हे क्रमप्राप्त होते. असे असताना शासनस्तरावर प्रस्ताव पाठवून मंजुरी येण्याची वाट न पहाता अवजार संचांची खरेदी केली. अवजार संचांचे १०० टक्के अनुदानावर विविध कार्यक्रमांतर्गत आदिवासी विभागामार्फत मोफत वाटप करण्याची योजना शासनस्तरावर होती. असे असताना**

महामंडळाने त्याच धर्तीवर योजना आखण्याचे नियोजन हे समर्थनीय नव्हते. त्यासाठी अनुसरण्यात आलेली कार्यपद्धती देखील आक्षेपार्ह होती. शासनस्तरावरील १०० टक्के अनुदान तत्वावर अवजारे संचाची वितरणाची योजना असल्यामुळे अंशतः अनुदान तत्वावर संच घेण्यासाठी लाभार्थी मिळू शकले नाहीत. याचा संचालक मंडळाने प्रस्ताव मंजूर करताना साकल्याने विचार केल्याचे दिसून येत नाही. घाई-घाईने प्रस्ताव मंजूर करुन खाजगी संस्थेकडून अवजार संचांची खरेदी केली व जवळ-जवळ चार वर्षे सर्व संच वितरणाविना पडून राहिले. महालेखाकारांनी आक्षेप नोंदविल्यानंतर ही परिस्थिती शासनाच्या निदर्शनास आली. या सर्व गोष्टींचा विचार करता या नियोजनशुन्यतेमधून अनियमित प्रकार करुन महामंडळास आर्थिकदृष्ट्या अडचणीत आणल्याचे स्पष्ट दिसून येते व याबाबत संबंधितांवर विभागीय चौकशीसाठीचे प्रस्ताव ते देखील विलंबाने सादर केले गेले आहेत. याबाबतीत उपक्रमाची स्वायत्तता व कार्यक्रमाची पारदर्शकता स्पष्ट होण्यासाठी यासंदर्भातील व्यवहार सुस्थीर व्यापारी तत्वावर सुयोग्य वाणिज्यिक प्रथानुसार होणे अत्यंत आवश्यक होते. महामंडळाच्या उद्दिष्टांपूर्तीकडे पूर्णपणे दुर्लक्ष झाल्याचे स्पष्ट होते. याकरिता या एकंदरीत प्रकरणाचा साकल्याने विचार करता या प्रकरणी झालेल्या आर्थिक नुकसानीचे मूल्यमापन करून त्याची संबंधितांकडून नुकसान भरपाई वसूल करण्यात यावी. याबाबतीतील संपूर्ण कार्यवाही विभाग स्तरावर दोन महिन्यांच्या आत पूर्ण करण्यात यावी. केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यांच्या आत कळविण्यांत यावी, अशी समितीची शिफारस आहे.

या महामंडळाच्या साक्षीदरम्यान तसेच समितीने यापूर्वी छाननी केलेल्या काही महामंडळाच्या कामकाजाची रुपरेषा तपासली असता महामंडळावर नेमण्यात आलेल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून महामंडळामध्ये घडत असलेल्या अनियमीत प्रकरणांवर वेळीच उचीत कारवाई न करून कायदेशीर बाबींचे निराकरण केले जात नाही. त्यामुळे पुढील काळात विशेषतः महालेखाकारांच्या लेखापरिक्षणांच्या माध्यमातून बऱ्याच अनियमित बाबी निदर्शनास येतात. महामंडळ स्थापनेमागील शासनाचे मुख्य उद्दिष्ट बाजूला राहून महामंडळाकडून राबविण्यात येणाऱ्या योजना सामान्य व्यक्तिपर्यंत पोहचत नाहीत. यासाठी शासनाच्या सर्व महामंडळांच्या कार्यपद्धतीमध्ये सुधारणा होण्याची अत्यंत आवश्यकता आहे. याकरिता शासनाने महामंडळावर असलेले नियंत्रण अत्यंत प्रभावशालीरीत्या राबविणे गरजेचे आहे की, जेणेकरून अनियमित बाबी घडणार नाहीत. याकरिता सर्व महामंडळांचे कामकाज पारदर्शक व वाणिज्यिक प्रथांना अनुसरून करण्यासाठी एक मार्गदर्शनपर लेखी कार्यप्रणाली आखून देण्यात यावी. याप्रकरणी केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यांच्या आत कळविण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.

## " मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळ "

**सर्वसाधारण मूल्यमापन :**

४.१ मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळाच्या कामकाजाविषयी आढावा घेण्यासाठी अल्पसंख्यांक विकास विभागाचे प्रधान सचिव तसेच मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक यांची समितीने त्यांनी सादर केलेल्या लेखी माहितीच्या अनुषंगाने गुरुवार, दिनांक १३ जानेवारी २०११ रोजी साक्ष घेतली. अल्पसंख्यांक विभागाच्या प्रधान सचिवांनी महामंडळबाबत समितीला माहिती देताना विषद केले की, राज्य शासनाकडून २८ सप्टेंबर २००० रोजी कंपनी अधिनियम, १९५६ अंतर्गत अल्पसंख्यांक समाजातील आर्थिक दृष्ट्या मागास घटकांचा आर्थिक विकास करण्याचे मुख्य उद्दीष्ट ठेवून या महामंडळाची स्थापना केली आहे. महामंडळाला राज्य शासनाकडून १७०.०० कोटी रुपये ऐवढे अधिकृत भांडवलापैकी १५१ कोटी रुपये भाग भांडवल म्हणून उपलब्ध करून दिलेले आहे व महामंडळामार्फत मौलाना आझाद थेट कर्ज योजना, उन्नती मुदत कर्ज योजना, राजीव गांधी शैक्षणिक कर्ज योजना, मौलाना आझाद शैक्षणिक कर्ज योजना, मायक्रो फायनांन्स, महिला समृध्दी, शेतकरी व मच्छीमारासाठी कर्ज योजना व अल्पसंख्याक समुह विकास कार्यक्रम व विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक प्रशिक्षण योजना राबविल्या जातात. राज्यातील मुस्लीम, शीख, ख्रिश्चन, पारशी, बौध्द व जैन या समाजाला अल्पसंख्याक म्हणून नमूद केलेले आहे. शासन पुरस्कृत योजनेसाठी कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न शहरासाठी रुपये ६५ हजारापेक्षा कमी व ग्रामीण भागासाठी रुपये ५० हजारांपेक्षा कमी तसेच केंद्रशासन पुरस्कृत योजनांसाठी शहरी भागासाठी रुपये ५४,५०० पेक्षा कमी व ग्रामीण भागासाठी रु. ३९,५०० पेक्षा कमी उत्पन्नाच्या मर्यादेचे निकष आहेत. महामंडळाकडून आतापर्यंत ८७.९५ कोटी रुपये ऐवढे कर्ज वाटप केलेले असून, कर्ज वसुलीची टक्केवारी ३० ते ३५ टक्के आहे. लाभार्थ्यासाठी व्याजाचा दर ६ टक्के ठेवण्यात आलेला आहे. नफ्याबाबत महामंडळाची स्थिती काय आहे व तो कशा प्रकारे काढला जातो या प्रश्नाला उत्तर देताना विभागाच्या प्रधान सचिवांनी सांगितले की, कंपनी अधिनियमानुसार व्याजाची परीगणना करण्यात येवून जे व्याज भविष्यात प्राप्त होणार आहे ते प्राप्त नफ्यामध्ये दाखविले जाते. त्यामुळे नफा जास्त झाल्याचे सकृत दर्शनी दिसून येते. एकूण वितरणाच्या रक्कमेपैकी ११ कोटी रुपयांची रक्कम कर्ज वसुलीतून प्राप्त झालेली आहे. हे देखिल त्यांनी उत्तरादाखल स्पष्ट केले. वितरण केलेल्या कर्जापैकी प्रत्यक्ष वसूल करण्यात आलेल्या कर्जाची रक्कम पहाता महामंडळ नफ्यात असू शकणार नाही, याबाबत खुलासा करावयास सांगितला असता विभागीय सचिवांनी सांगितले की, रुपये १७० कोटी निधी पैकी रुपये १४३ कोटी निधीचे वाटप केले यामध्ये २७ कोटी रुपयांचा फरक आहे. कर्जावरील व्याज जमा होते. तसेच देण्यात आलेले भाग भांडवलापैकी काही रक्कम वितरणासाठी ठेवण्यात येऊन काही रक्कम बँकेद्वारे मुदत

ठेवीमध्ये गुंतविल्यामुळे महामंडळाला नफा झालेला आहे. महामंडळाचे कामकाज मिटकॉन या संस्थेमार्फत चालविले जात असून, त्या संस्थेच्या कामकाजाबद्दल मा. समिती प्रमुखांनी नाराजी व्यक्त केली असता समिती प्रमुखांच्या वक्तव्याला पुष्टी देताना विभागीय सचिवांनी स्पष्ट केले की, मिटकॉनबद्दल काही तक्रारी शासनाकडे व काही तक्रारी महामंडळाकडे आल्या होत्या. म्हणून त्यांचा करार एक वर्षासाठी रद्द केला होता. परंतु महामंडळाकडे योजना राबविण्यासाठी दुसरी कुठलीही पर्यायी व्यवस्था नसल्यामुळे मिटकॉन या कंपनीकडील व्यवहार पुन्हा चालू ठेवावे लागले आहेत व ते काम अत्यंत परिणामकारक करण्याचा देखील महामंडळाचा प्रयत्न आहे. महामंडळ स्वयंपूर्ण होण्यासाठी नवीन पदांची निर्मिती करण्यात आली असून, यासाठी पद भरण्याची कार्यवाही सध्या सुरू आहे. महामंडळाच्या योजनेतील ग्रामीण भागातील लाभार्थ्यांची संस्था कमी असल्याबाबतच्या प्रश्नाला उत्तर देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, संस्थांची निवड करण्याचे काम आयुक्तांकडून केले जाते. शासनाकडून निधी आयुक्तांकडे दिला जातो. व आयुक्त याबाबत इतर संबंधित सहकार्यांच्या मदतीने निधी वितरित करीत असतात. स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये लाभार्थ्यांना मदत मिळण्याच्या दृष्टीने अडचण होते. यासाठी शासनाने पद निर्मितीचा निर्णय घेतला असून, पदे भरल्यानंतर यामध्ये सुसूत्रता येईल असे वाटते. तसेच समिती सदस्यांनी सुचविल्याप्रमाणे याबाबत अन्य कुठल्या यंत्रणेकडून मदत घेऊन काम कसे करता येईल याबाबत संचालक मंडळ स्तरावर निर्णय घ्यावा लागेल व अशा सूचनांचा जरूर विचार करण्यात येईल असेही त्यांनी स्पष्ट केले. प्रशिक्षण योजनेसाठी मिटकॉनकडून किती प्रशिक्षित लाभार्थ्यांना प्रशिक्षण दिले व यासाठी किती निधी उपलब्ध केला व किती लाभार्थ्यांना महामंडळाकडून कर्ज उपलब्ध करून दिले या समिती सदस्यांच्या प्रश्नाला उत्तर देताना व्यवस्थापकीय संचालकांनी सांगितले की, २२ वेळा प्रशिक्षण कार्यक्रम घेऊन ६०७ लोकांना प्रशिक्षीत केले आहे व यासाठी मिटकॉनच्या माध्यमातून ७ कोटी ८० हजार रुपये इतका खर्च झालेला आहे. परंतु प्रत्यक्ष प्रशिक्षण दिलेल्या लाभार्थ्यांपैकी किती लाभार्थ्यांना कर्ज दिले याची माहिती उपलब्ध नाही असेही त्यांनी स्पष्ट केले. अल्पसंख्याक लोकांची जास्त लोकसंख्या असलेल्या जिल्ह्यात लोकसंख्येच्या प्रमाणात कर्जाचे वाटप करण्यात येते काय ? या समिती सदस्यांच्या प्रश्नाला उत्तर देताना व्यवस्थापकीय संचालक यांनी सांगितले की, जिल्ह्यातील अल्पसंख्याक लोकसंख्येच्या निकषानुसार या पुढील काळात कर्जाचे वाटप करण्याचे नियोजन आहे. अल्पसंख्याक समाजातील विर्निर्दिष्ट केलेल्या काही समाजातील लोकांना अद्यापही आपला अल्पसंख्याक समाजात समावेश आहे याबद्दल माहिती नाही. या समिती प्रमुखांच्या प्रश्नाला उत्तर देताना व्यवस्थापकीय संचालकांनी सांगितले की, ख्रिश्चन जातीच्या समाजाला माहिती होण्यासाठी महसूल विभागीय स्तरावर काही मेळावे घेतले गेले आहेत. ग्रामीण भागातील जनतेला माहिती होण्यासाठी पंचायत समिती स्तरावर याबाबतचे काम सोपवून जास्तीत जास्त लोकांना त्याचा फायदा कसा मिळवून देता येईल या समिती

सदस्यांच्या प्रश्नाला उत्तर देताना व्यवस्थापकीय संचालक यांनी सांगितले की, येत्या दोन महिन्यात कर्मचारी भरती करून महामंडळाकडूनच याबाबतची कार्यवाही केली जाईल असे त्यांनी सांगितले. तसेच कर्ज वसुलीच्या रक्कमेपोटी देण्यात आलेले अग्रिम दिनांकाचे धनादेश बँकेत सादर केल्यानंतर ते न वटण्याचे प्रमाण जवळ-जवळ ५० टक्क्यांपेक्षा जास्त आहे असेही त्यांनी एका प्रश्नाच्या उत्तरादाखल स्पष्ट केले. शासनाकडून महामंडळ स्तरावरील कार्यपद्धतीबाबत काही सूचना मिळाल्या असून, कर्ज वितरणासाठी असलेली पद्धत तसेच प्रत्येक विविध घटकासाठी देण्यात येणारे कर्ज व्यवस्थित दिली गेली पाहिजेत व त्यामध्ये सुसूत्रता राखणे गरजेचे आहे. अशा सूचना प्राप्त झालेल्या आहेत. सदर मार्गदर्शक सूचनेनुसार पुढील काळात जरूर प्रगती केली जाईल. विद्यार्थ्यांसाठी प्रशिक्षण योजनेकरिता केंद्र शासनाकडून २.५० लाख रुपये दिले जातात. महाराष्ट्र शासनाने यामध्ये पुढाकार घेऊन त्याची मर्यादा ५.लाखांपर्यंत वाढविलेली आहे. या योजनेमधून आतापर्यंत १,४६१ लाभार्थी होते व त्यांना एकूण ९ कोटी ४० रुपये कर्जापोटी वितरण केलेले आहे. विद्यार्थ्यांसाठी प्रशिक्षण योजनेमध्ये वाढ होणे आवश्यक आहे, या समिती प्रमुखांच्या प्रश्नाला उत्तर देताना व्यवस्थापकीय संचालक यांनी सांगितले की, गत काही वर्षातील लाभार्थ्यांची संख्या पहाता यामध्ये सतत वाढ होत आहे व पुढील काळात या योजनेचा प्रमाणामध्ये वाढ करण्यासाठी सदर विषय संचालक मंडळासमोर आणून संचालक मंडळाच्या सहमतीने याबाबत कार्यवाही करण्यात येईल असेही त्यांनी साक्षीच्या शेवटी स्पष्ट केले.

**४.२ अभिप्राय व शिफारशी :**

**" मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ " हे राज्यातील अल्पसंख्याक समाजातील आर्थिकदृष्ट्या मागास व्यक्तींच्या विकासाच्या उद्देशाने स्थापन झाले आहे. या महामंडळातर्फे राज्याच्या व केंद्र शासन पुरस्कृत विविध योजनेच्या माध्यमातून राज्यातील अल्पसंख्याक आर्थिक मागास प्रवर्गातील व्यक्तिंना कर्जाच्या स्वरूपात आर्थिक सहाय्य दिले जात आहे. तथापि, महामंडळ मिटकॉन या खाजगी संस्थेमार्फत विविध योजना स्थानिक स्तरावर पोहचविण्याचे काम करत असल्याची बाब समितीस आढळून आली या खाजगी संस्थेच्या कार्यपद्धतीबाबत नाराजी असल्याची तसेच राज्यातील बहुतांश लाभधारकांना ही योजना ज्ञातदेखील केले जात नसल्याची बाब समितीने उपस्थित केली असता, त्यास विभागीय सचिवांनी देखिल पृष्टी दिली. परंतु ही योजना राबविण्यासाठी कुठलाही पर्याय उपलब्ध नसल्याने सदर संस्थेला काम देण्यात येते. या विभागीय सचिवांच्या म्हणण्याबद्दल समितीला आश्चर्य वाटते. मंडळाने शहरी वा ग्रामीण भागातील अल्पसंख्याक समाजाच्या लाभधारकांना फायदा होण्यासाठी जिल्हा परिषद व पंचायत समिती स्तरावरून तसेच महानगरपालिका, नगरपालिका सारख्या**

स्थानिक स्वराज्य संस्थेची योजना राबविण्यास मदत घेतल्यास या योजना अधिकाअधिक लाभधारकांपर्यंत पोहचतील त्या दृष्टीने कार्यवाही करावी अशी समिती शिफारस करते. यामुळे सामान्यातील सामान्य लाभधारकाला योजना समजून जास्तीत जास्त फायदा मिळेल असे समितीचे मत आहे. शासन स्तरावरून महामंडळाला आवश्यक असलेली पदे भरण्याचा निर्णय विलंबाने झालेला असल्यामुळे त्याचा देखील महामंडळाच्या कार्यपद्धतीवर परिणाम झाल्याचे दिसून आलेले आहे. राज्याचा सार्वजनिक उपक्रम असलेल्या महत्त्वाच्या महामंडळाचे कामकाज खाजगी संस्थेच्या मदतीने व्हावे. हे कधीही समर्थनीय ठरणार नाही. त्यामुळे महामंडळाच्या कामाची निकड आणि व्याप्ती लक्षात घेऊन आवश्यक तो आकृतीबंध तयार करून तातडीने नोकर भरतीची प्रक्रिया करावी. महामंडळाने शासनाकडून प्राप्त झालेल्या भागभांडवलातील काही भाग बँकांमध्ये मुदत ठेवीच्या स्वरूपात गुंतवून व्याज घेण्यात समाधान मानले असल्याने अनेक पात्र लाभधारकांवर त्याचा अप्रत्यक्ष परिणाम झालेला आहे हे सत्य आहे. संचालक मंडळ स्तरावरून याबाबत, पुनर्विलोकन होणे गरजेचे आहे. योजना राबविण्याच्या यंत्रणेमध्ये अधिक कार्यक्षमतेची आवश्यकता आहे. राज्यातील जास्तीत जास्त अल्पसंख्याक लोकसंख्या असलेल्या जिल्ह्यांत त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात कर्जाचे वाटप करावे, अशी समितीची शिफारस आहे. राज्यात अल्पसंख्याक म्हणून असलेल्या मुस्लीम, शीख, ख्रिश्चन, पारशी, बौद्ध व जैन या समाजातील आर्थिकदृष्ट्या मागास लोकांना महामंडळ स्तरावरून मदत दिली जाते याची योग्य प्रकारे जास्तीत जास्त प्रसिद्धी करणे आवश्यक आहे. जेणेकरून अल्पसंख्याक समाजातील सर्वच घटकांना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात फायदा मिळू शकेल. एकूण कर्जाच्या वसुलीचे प्रमाण पाहता व वसुली संदर्भात न्यायालयात दाखल झालेल्या प्रकरणांचा विचार करता महामंडळाच्या कार्यपद्धतीबाबत समिती असमाधान व्यक्त करते. महामंडळाची कार्यक्षमता अधिक सुधारण्यासाठी शासनाच्या मार्गदर्शक तत्त्वांचा महामंडळ स्तरावर काटेकोरपणे पालन होणे गरजेचे आहे व त्यावर शासनाने देखील नियंत्रण ठेवणे गरजेचे आहे. या महामंडळातर्फे शैक्षणिक कर्जाच्या वाटपाचे प्रमाण अत्यल्प असून, अल्पसंख्याक समाजातील मुलांना शैक्षणिकदृष्ट्या संपन्न होण्यासाठी अधिक प्रमाणात शैक्षणिक कर्ज वाटप करणे गरजेचे आहे. त्यादृष्टीने संचालक मंडळाने पुढे निर्णय घेऊन प्रभावी अंमलबजावणी करावी. अशी समितीची शिफारस आहे. याप्रकरणी केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यांच्या आत कळविण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.

# बैठकींचे परिशिष्ट

## गुरुवार, दिनांक ३ मार्च २०११, विधान भवन, मुंबई

**उपस्थिती :**

१. श्री. सदाशिवराव हणमंतराव पाटील, वि.स.स. तथा समिती प्रमुख

२. श्री. सुभाष रामचंद्र धोटे, वि.स.स.

३. श्री. विवेकानंद शंकर पाटील, वि.स.स.

४. श्री. संजय वाघचौरे, वि.स.स.

५. श्री. हनुमंत जगन्नाथ डोळस, वि.स.स.

६. श्री. जयकुमार रावळ, वि.स.स.

७. श्रीमती शोभाताई फडणवीस, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

श्री. सुधीर वळवी, अवर सचिव (समिती)

**महालेखाकार कार्यालय, मुंबई :**

१. श्रीमती सायंतनी जाफा, महालेखापाल (वाणिज्यिक),

२. श्री. पी. पी. लोणकर, वरिष्ठ लेखाधिकारी.

**विभागीय अधिकारी :**

श्री. टी. सी. बेंजामीन, प्रधान सचिव, नगरविकास विभाग.

**महाराष्ट्र शहर व औद्योगिक विकास महामंडळ मर्यादित :**

श्री. तानाजी सत्रे, व्यवस्थापकीय संचालक (अतिरिक्त पदभार).

समितीने भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००७-२००८ च्या वाणिज्यिक अहवालातील महाराष्ट्र शहर व औद्योगिक विकास महामंडळाच्या परिच्छेदासंबंधात विभागीय सचिवांची तथा महामंडळाच्या प्रतिनिधींची साक्ष घेतली.

**मंगळवार, दिनांक ८ मार्च २०११, विधान भवन, मुंबई**

**उपस्थिती :**

१. श्री. सदाशिवराव हणमंतराव पाटील, वि.स.स. तथा समिती प्रमुख

२. श्री. मधु चव्हाण, वि.स.स.

३. श्री. विवेकानंद शंकर पाटील, वि.स.स.

४. श्री. हनुमंत जगन्नाथ डोळस, वि.स.स.

५. श्री. बदामराव लहुराव पंडित, वि.स.स.

६. श्री. राजन विचारे, वि.स.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

श्री. सुधीर वळवी, अवर सचिव (समिती)

**महालेखाकार कार्यालय, मुंबई :**

श्रीमती सायंतनी जाफा, महालेखापाल (वाणिज्यिक),

श्री. पी. पी. लोणकर, वरिष्ठ लेखाधिकारी अधिकारी.

**विभागीय अधिकारी**

श्री. उत्तम खोब्रागडे, प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग.

श्री. भ. प्र. सिंह, सहसचिव, आदिवासी विकास विभाग.

**शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्यादित, नाशिक**

श्री. टी. के. बागुल, व्यवस्थापकीय संचालक.

श्री. एम. एल. भारती, महाव्यवस्थापक, वित्त.

श्री. एन. डी. वऱ्हाडे, मॅनेजर (प्रोजेक्ट).

समितीने भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००७-२००८ च्या (वाणिज्यिक) अहवालातील शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्यादित यांच्या परिच्छेदासंबंधात विभागीय सचिवांची तथा महामंडळाच्या प्रतिनिधींची साक्ष घेतली.

## गुरुवार, दिनांक १३ जानेवारी २०११, विधान भवन, मुंबई

**उपस्थिती :**

१. श्री. सदाशिवराव हणमंतराव पाटील, वि.स.स. तथा समिती प्रमुख

२. श्री. मधु चव्हाण, वि.स.स.

३. डॉ. कल्याण काळे, वि.स.स.

४. श्री. सुभाष धोटे, वि.स.स.

५. श्री. विवेकानंद शंकर पाटील, वि.स.स.

६. श्री. विक्रमसिंह पाटणकर, वि.स.स.

७. श्री. संजय वाघचौरे, वि.स.स.

८. श्री. हनुमंत डोळस, वि.स.स.

९. श्री. प्रताप सरनाईक, वि.स.स.

१०. श्री. चरणसिंग सप्रा, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

श्री. श्रीधर राजोपाध्ये, उप सचिव,

श्री. सुधीर वळवी, अवर सचिव (समिती).

**अल्पसंख्याक विकास विभाग,**

श्री. सुनिल पोरवाल, प्रधान सचिव.

श्रीमती एस. एस. कादरी, सहसचिव.

**मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ मर्यादित, मुंबई**

श्री. जी. आर. शेख, व्यवस्थापकीय संचालक.

समितीने मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ मर्यादित यांच्या कामकाजासंबंधातील आढाव्याबाबत विभागीय सचिवांची तथा महामंडळाच्या प्रतिनिधींची साक्ष घेतली.

## शुक्रवार, दिनांक १ एप्रिल २०११, विधान भवन, मुंबई

**उपस्थिती :**

१. श्री. सदाशिवराव हणमंतराव पाटील, वि.स.स. तथा समिती प्रमुख

२. श्री. मधु चव्हाण, वि.स.स.

३. श्री. विवेकानंद पाटील, वि.स.स.

४. श्री. विक्रमसिंह पाटणकर, वि.स.स.

५. श्री. हनुमंत डोळस, वि.स.स.

६. श्री. प्रमोद जठार, वि.स.स.

७. श्री. महादेव बाबर, वि.स.स.

८. श्री. प्रविण दरेकर, वि.स.स.

९. श्री. जयप्रकाश छाजेड, वि.प.स.

१०. श्री. हेमंत टकले, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. श्रीधर राजोपाध्ये, उप सचिव,

(२) श्री. सुधीर वळवी, अवर सचिव (समिती).

समितीने प्रारुप अहवालाच्या मसुद्यांवर विचार करून तो काही सुधारणांसह सहमत केला.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई